सदरचा मुद्रांक लिव्ह अॅण्ड लायसेन्ससाठी नाही.

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2015 ◐ PM 715052

अनुक्रमांक ५६८३ दिनांक २९/७/१७ रुपये १०० 
मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे MOU 
मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद क्र. 
मुद्रांक वापरणाऱ्याचे संपूर्ण नांव मा. प्राचार्य तुळजाराम चतुरचंद 
संपूर्ण पत्ता महाविद्यालय बारामती 
हस्ते व्यक्तींचे नांव विकास जगताप 
पत्ता बारामती

Mrs SMTambade 
सौ. एस.एम.तांबडे, मुद्रांक विक्रेती 
परवाना क्र.२२०३०२१/२०१८ पर्यंत नुतनीकृत 
विक्री-आनंदनगर, बारामती, जि.पुणे

Jagtap 
मुद्रांक खरेदीदार/हस्ते व्यक्तीचे सही

उपकोषागार कार्यालय बारामती 
- 7 JUL 2017 
उपकोषागार अधिकारी 
बारामती

शैक्षणिक सहकार्य करार

आमचे अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय हे ग्रामीण भागातील एक प्रख्यात व नावलौकीकपात्र महाविद्यालय आहे. महाविद्यालयास नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून 'उत्कृष्ठ महाविद्यालय' व 'उत्कृष्ठ प्राचार्य' पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच नॅक, बेंगलोर यांचेकडून 'A+' हा दर्जा प्राप्त झाला आहे. महाविद्यालयामध्ये DST, DBT, UGC, B.Voc. अंतर्गत अनेक उपक्रम राबवले जातात. सर्वांना शिक्षणाचा लाभ व्हावा व शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी गेल्या ५४ वर्षापासून महाविद्यालय कार्यरत आहे. या महाविद्यालयामध्ये साधारणपणे दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

श्री. महेश सुरेश जोशी. अध्यक्ष/प्रशिक्षक, 'वसुंधरा' भाषा, मोडिलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे–४११ ०३० ही संस्था चालवितात. जी मागील ५ वर्षापासून पुणे, नगर, लातूर, सोलापूर जिल्हयांतील विविध महाविद्यालयात प्रारंभिक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करत असते. पारंपारिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या इतर अंगभूत

..2..

गुणांना वाव देण्याच्या हेतूने, आपण शै.वर्ष २०१७-१८ पासून महाविद्यालयात कार्यरत असलेल्या 'सेंटर फॉर ओरिएंटल स्टडीज' (प्राच्यविद्या केंद्र) मार्फत वसुंधरा भाषा, मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे यांच्याबरोबर मोडीलिपी प्राथमिक प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यासाठी -

डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरुमकर
प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
बारामती, जि.पुणे

आणि

श्री. महेश सुरेश जोशी, अध्यक्ष/प्रशिक्षक
वसुंधरा भाषा, मोडिलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे - ४११ ०३०.

हे दोन्ही संस्थांमध्ये शैक्षणिक सहकार्य करार करीत आहेत.

करारातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे -

१. या प्रशिक्षण वर्गासाठी महाविद्यालयामार्फत प्रवेश दिला जाईल. (विद्यार्थी संख्या-एक बॅच ५०)
२. प्रशिक्षणासाठी महाविद्यालय व अन्य इच्छुकांना देखील सहभागी होता येईल.
३. कोर्स आठवड्यातून ६ दिवस (सोमवार ते शनिवार) महाविद्यालयात राबवला जाईल.
४. सदर प्रशिक्षणाचा कालावधी वेळोवेळी गरजेनुसार ठरविला जाईल.
५. कोर्सच्या फीबाबत परस्पर सहमतीने निर्णय घेण्यात येईल.
६. करारात आवश्यक असल्यास आवश्यक तो बदल परस्पर सहमतीने केला जाईल.
७. दोन्ही संस्थांच्या सहमतीने शासकीय, निमशासकीय व अन्य नागरिकांसाठी हा कोर्स महाविद्यालयात राबविला जाईल.
८. हा करार शै.वर्ष २०१७-१८ ते २०२४-२५ पर्यंत अस्तित्वात राहील.
९. हा कोर्स यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्यास दोन्ही संस्थांच्या सहमतीने सर्टिफिकेट दिले जाईल.
१०. दोन्ही संस्था केवळ प्रशिक्षण नव्हे तर अनेक विविध उपक्रम देखील एकत्रितपणे राबवतील व या उपक्रमामार्फत मोडी प्रशिक्षण वृद्धीसाठी आवश्यक कार्यक्रम राबवतील.

सदर तरतुदी दोन्ही संस्थांस मान्य असून त्यानुसार सदर शैक्षणिक सहकार्य करार आज रोजी मान्य करण्यात येत आहे.

श्री.महेश सुरेश जोशी
अध्यक्ष/प्रशिक्षक
'वसुंधरा' भाषा, मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे

डॉ.चंद्रशेखर मुरुमकर
प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

Tuljaram Chaturchand Coll... Baramati

बारामती

शनिवार, दि. २९ जुलै २०१७

साक्षीदार - १. डॉ.सचिन गाडेकर 29/07/2017
२. प्रा.सुनिल लोखंडे
३. प्रा. पुष्कर एकबोटे 29/07/2017

महेश सु. जोशी — सौ. मालिनी म.जोशी
अध्यक्ष — सेक्रेटरी
'वसुंधरा' भाषा मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे.